27 FEB 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# व्यवसायाच्या अपेक्षा पूर्ततेसाठी उद्योग–शिक्षण क्षेत्रांचा सुसंवाद आवश्यक

- कोल्हापूर चेंबरचे उपाध्यक्ष भरत ओसवाल यांचे प्रतिपादन
- पीएम उषा योजनेअंतर्गत विद्यापीठात सुसंवाद कार्यक्रमाचे उद्घाटन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

व्यवसायाच्या अपेक्षा पूर्ण करणारी युवा पिढी निर्माण करण्यासाठी उद्योग–शिक्षण या क्षेत्रांचा सुसंवाद आवश्यक आहे, असे प्रतिपादन कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रिजचे उपाध्यक्ष भरत ओसवाल यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्यावतीने पीएम–उषा योजनेअंतर्गत आयोजित केलेल्या उद्योग विद्यापीठ सुसंवाद कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. महेंद्र ज्वेलर्सचा उद्योजकीय प्रवास उलगडताना त्यांनी विद्यार्थ्यांना काही महत्वाच्या टिप्स दिल्या

"कष्ट व काम करण्याची तयारी ठेवल्यास पैसा आपोआप येईल. सुवर्णालंकार व्यवसायातील नवोपक्रम अंगीकारल्यामुळे व्यवसायाचा विकास होत गेला ध्येय निश्चित करून त्यावर काम करा प्रामाणिकपणावर स्पर्धेत टिकून राहता येते. प्रतिभा गुण




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्यावतीने पीएम–उषा योजनेअंतर्गत आयोजित केलेल्या उद्योग विद्यापीठ सुसंवाद कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना भरत ओसवाल व इतर मान्यवर.**

आणि मेहनत यावर युवकांना संधी आहे. टीम–वर्कचे, वेळेच्या शिस्तीचे कौशल्य प्राप्त करण्याचे आवाहन श्री. ओसवाल यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. महाजन म्हणाले की, शिक्षण क्षेत्राचा उद्योग–व्यवसायांशी संवाद अत्यंत आवश्यक असून अभ्यासक्रम, संशोधन, आंतरवासिता आणि कर्मचारी नियुक्ती या विविध गोष्टींसाठी दोन्ही क्षेत्रांना तो लाभदायक आहे. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. केदार मारुलकर यांनी केले. तर डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. दुसऱ्या सत्रात समर्थ ग्रुप ऑफ कंपनीजचे व्यवस्थापकीय संचालक संजय कारखानीस म्हणाले, "जीवनामध्ये ३ एफ हे पर्याय असतात. तो निवडण्यासाठी व्यवसायातील प्रत्यक्षज्ञान, कौशल्ये, प्रज्ञा व आणि वृत्ती यांचा अंगीकार करा आणि तंत्रज्ञानातील बदल आत्मसात करा. ज्ञान असण्याच्या नोकऱ्या संपणार आहेत पण ज्ञानाचे उपयोजन असणाऱ्या नोकऱ्या असणारच आहेत." तिसऱ्या सत्रात ॲडप्त कॅन्सल्टंटचे अमित माटे यांनी विद्यार्थ्यांना व्यवसाय उभारणीसाठी मार्गदर्शन केले. चौथ्या सत्रात पॅनेल चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये चार्टर्ड अकौंटट गिरीश. सामंत,व्यवस्थापन सल्लागार डॉ. महादेव शिंदे, माजी विद्यार्थी प्रा. डॉ. अनिल सूर्यवंशी, उद्योग–विद्यापीठ सुसंवाद कक्षाचे समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी भाग घेतला. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.. प्रास्ताविक डॉ. केदार मारुलकर यांनी केले. तर डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी- युवराज टिपुगडे, श्रीमती मंजिरी कांबळे, प्रेषित कांबळे, श्रीमती धनेश्वरी शिंदे, हरीश कांबळे, भरत रावण, सुरज, तुषार पाटील आणि सामी मुल्ला यांनी परिश्रम घेतले.

27 FEB 2026

सकाळ

# विविध स्पर्धांतून विद्यापीठात विज्ञान दिन उपक्रमांना प्रारंभ

कोल्हापूर, ता. २६ : निबंध, प्रश्नमंजूषा, ई-पोस्टर, कोलोकीयम, वक्तृत्व, रांगोळी अशा विविध स्पर्धांच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त तीन दिवसीय उपक्रमांना प्रारंभ झाला. 'विज्ञानातील महिला: विकसित भारत उत्प्रेरक' या संकल्पनेवर आधारित उपक्रम होणार आहेत.

या उपक्रमांची सुरुवात कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून करण्यात आली. त्यांनी वैज्ञानिक संशोधनाचे महत्त्व, नवकल्पनांची गरज आणि विद्यार्थ्यांची राष्ट्रनिर्मितीतील भूमिका अधोरेखित केली. विद्यापीठातील महिला, विद्यार्थिनींनी संशोधन क्षेत्रात अधिक लक्ष केंद्रित करून नोबेल पारितोषिकापर्यंत मजल मारण्याचे ध्येय ठेवावे, असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. एस. आर. यंकंची यांनी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट केला. वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या समन्वयिका प्रा. (डॉ.) एम. व्ही. वाळवेकर यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त होणाऱ्या विविध स्पर्धांमध्ये १५६ स्पर्धकांनी नोंदणी केली असल्याचे सांगितले.

27 FEB 2026

पुण्यनगरी

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यापीठात आज व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'विरामचिन्हांचा वापर आणि महत्त्व' या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. हे व्याख्यान शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता मराठी विभागाच्या सभागृहात होईल.

मराठी भाषेतील व्याकरणाचे आणि विरामचिन्हांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात डॉ. अनिल गवळी आणि डॉ. गिरीश मोरे हे प्रमुख वक्ते म्हणून आपले विचार मांडणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे असतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 FEB 2026 पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय परिसंवाद

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील सामाजिक समावेश अभ्यास केंद्राच्या वतीने दि. २७ व २८ रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. 'कोणीही मागे राहू नये : सामाजिक समावेशासाठी शिक्षणाचा पुनर्विचार' हा चर्चासत्राचा मुख्य विषय आहे.

परिसंवादाचे उद्घाटन शुक्रवारी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठातील शिक्षणशास्त्र सभागृहात होणार आहे. यावेळी प्रा. अशोक कांबळे, प्राध्यापक, डी. एस. सावकार अध्यासन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या हस्ते उद्घाटन होईल. प्रा. रेणू दांडेकर, संस्थापक, लोकसाधना, पुणे यांचे बीजभाषण होणार आहे. अध्यक्षस्थानी प्रा. श्रीकृष्ण महाजन असतील. प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी यांनी परिसंवादात सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक समावेश अभ्यास केंद्राचे संचालक प्रा. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

27 FEB 2026

पुढारी

# विद्यापीठातील विद्यार्थिनींनी नोबेल पारितोषिकापर्यंत मजल मारावी : डॉ. शिंदे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील महिला, विद्यार्थिनींनी संशोधन क्षेत्रात अधिक लक्ष केंद्रित करून नोबेल पारितोषिकापर्यंत मजल मारण्याचे ध्येय ठेवावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभागात राष्ट्रीय विज्ञान दिन कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. एस. आर. यंकंची यांनी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट केला. समन्वयक प्रा. डॉ. एम. व्ही. वाळवेकर यांनी प्रस्ताविकेतून राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. यावेळी प्रा. अ. अ. देशमुख, प्रा. एन. ए. कांबळे, प्रा. एस. एम. गायकवाड, प्रा. एम. पी. भिलावे, डॉ. ए. डी. गोफणे, डॉ. ए. एस. लोखंडे आदी उपस्थित होते. प्रा. एन. ए. कांबळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. सानिका हेबळे यांनी सूत्रसंचालन केले. अपर्णा पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 FEB 2026

# डॉ. म. सु. पाटील वैश्विक दृष्टिकोन अंगीकारलेले समीक्षक

## प्राचार्य डॉ. दिलीप धोंगड : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र व पुरस्कार वितरण समारंभ उत्साहात

**जनप्रवास : कोल्हापूर**

डॉ. म. सु. पाटील यांची समीक्षा व्रतस्थ आणि प्रमेयदर्शी आहे. त्यांनी निष्ठापूर्व व गांभीर्यपूर्वक समीक्षा लिहिली. प्रबंधात्मक ग्रंथ लिहिले. कलाकृतीकेंद्री समीक्षा करावी, असे त्यांचे म्हणणे होते. ते वैश्विक दृष्टिकोन अंगीकारलेले समीक्षक होते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. दिलीप धोंगडे (नाशिक) यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये मराठी अधिविभाग, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन व नव-अनुष्टुभ प्रतिष्ठान, येवला (नाशिक) यांच्या वतीने 'डॉ. म. सु. पाटील यांचा समीक्षाविचार' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र व *पुरस्कार वितरण समारंभाचे* आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. डॉ. म. सु. पाटील यांच्या कन्या-मराठीतील लेखिका नीरजा यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. धोंगडे म्हणाले, आदिबंधात्मक समीक्षा ही मानसशास्त्रातून आलेली आहे. डॉ. पाटील यांनी कर्तव्यबुध्दीने विपुल समीक्षा लिहून समीक्षेचा विस्तार मोठया प्रमाणात केला. त्यांना साहित्य अकादमीचे दोन पुरस्कार मिळाले आहेत. ते कधीही कोणत्याही एका पंथाचे झालेले नाही. त्यांच्या आधारवाटातील लेखन विद्यार्थ्यांच्या आणि समीक्षकांच्या उपयोगी पडत आहे. ज्ञानेश्वरीचे उत्तम विवेचन त्यांनी केले आहे. श्रीमद्भगवद्गीतेचे आकलन त्यांना झालेले होते. तृष्णेचा खरा सिध्दांत त्यांना गीतेमध्ये सापडला.




**कोल्हापूर : डॉ. म. सु. पाटील यांचा समीक्षाविचार या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना डॉ. दिलीप धोंगडे. सोबत मान्यवर.**

डॉ. प्रवीण बांदेकर म्हणाले, पाच दशकांपूर्वी अनुष्टुभच्या माध्यमातून वाङ्मयीन चळवळ सुरू झाली. मागील काही वर्षांमध्ये खेडयापाडयातील लिहित्या मंडळींना एक व्यासपीठ मिळवून दिले आहे. आपली परंपरा पुन्हा नव्याने पुढे आणण्याचा प्रयत्न होत आहे.

याप्रसंगी ज्येष्ठ लेखक डॉ. राजन गवस म्हणाले, डॉ. धोंगडे प्रशासनात असताना तुकारामांबाबत चिंतन करीत होते. यांची समीक्षा सहज, सोपी, सर्जनात्मक आहे. कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, ज्ञानेश्वरी, तुकाराम या साहित्यांकडे डॉ. म. सु. पाटील पहिल्यांदा गेलेले दिसतात. ते विवेकीय आणि विज्ञाननिष्ट दृष्टीकोन असलेले मातृहृदयी उत्तम समीक्षक होते. त्यांचे जीवन व कार्य या दोन्ही गोष्टींचा विद्यार्थ्यांनी साक्षेपाने अध्ययन करणे आवश्यक आहे.

डॉ. अशोक केळकर मराठी भाषा पुरस्कार मिळाल्याबद्दल मराठी अधिविभागाच्या वतीने प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे यांचा सत्कार डॉ. राजन गवस यांच्या हस्ते करण्यात आला.

प्रास्ताविक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. नंदकुमार मोरे यांनी केला तर प्रांजली क्षीरसागर *यांनी आभार* मानले. याप्रसंगी ज्येष्ठ लेखिका प्रतिभा कनेकर, एकनाथ पगार, अशितोष पाटील, वीरधवल परब उपस्थित होते.

2 7 FEB 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जनप्रवास

# विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिन उपक्रमांचे उद्घाटन

## प्राणिशास्त्र अधिविभागात विविध स्पर्धा : स्त्रीशक्तीचे विज्ञान क्षेत्रात योगदान, विकसित भारतवर परिसंवाद

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ येथील प्राणिशास्त्र विभागात राष्ट्रीय विज्ञान दिन-२०२६ चा उद्घाटन समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात झाला. स्त्रीशक्तीचे विज्ञान क्षेत्रात योगदान आणि विकसित भारत या विषयावर आधारित तीन दिवसीय कार्यक्रमांची सुरुवात प्रेरणादायी वातावरणात झाली. प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, एम.एस्सी. प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून करण्यात आली. या कार्यक्रमाच्या समन्वयीका प्रा. (डॉ.) एम. व्ही. वाळवेकर यांनी प्रस्तावनेतून राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व स्पष्ट केले तसेच कार्यक्रमाचे स्वरूप व नियोजन जाहीर केले. या वर्षी विविध



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथील प्राणिशास्त्र विभागात राष्ट्रीय विज्ञान दिन उद्घाटन समारंभप्रसंगी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत मान्यवर.

स्पर्धांसाठी एकूण १५६ स्पर्धकांनी नोंदणी केली असून त्यामध्ये ६६ निबंध, २६ प्रश्नमंजुषा, ३४ ई-पोस्टर, ६ कोलोकीयम, ११ वक्तृत्व आणि रांगोळी स्पर्धेचा समावेश आहे.

प्रमुख पाहुणे डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आपल्या भाषणात वैज्ञानिक संशोधनाचे महत्त्व, नवकल्पनांची गरज आणि विद्यार्थ्यांची राष्ट्रनिर्मितीतील भूमिका अधोरेखित केली. विद्यापीठातील महिला, विद्यार्थिनींनी संशोधन क्षेत्रातअधिक लक्ष केंद्रित करून नोबेल पारितोषिकापर्यंत मजल मारण्याचे ध्येय ठेवावे, असे त्यांनी आवाहन केले. तसेच विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना आदर्श मानून जिद्द, शिस्त आणि नेतृत्वगुण आत्मसात करावेत, असे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. (डॉ.) एस. आर. यंकंची यांनी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट केला व वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमास प्रा. अ. अ. देशमुख, प्रा. एन. ए. कांबळे, प्रा. एस. एम. गायकवाड, प्रा. एम. पी. भिलावे, डॉ. ए. डी. गोफणे, डॉ. ए. एस. लोखंडे यांच्या सहसंशोधक विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रा. एन. ए. कांबळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. सानिका हेबळे यांनी सूत्रसंचालन केले, तर अपर्णा पाटील यांनी आभार मानले.

27 FEB 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE

Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिन उपक्रमांचे उद्घाटन

## प्राणिशास्त्र अधिविभागात विविध स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर, ( महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठ येथील प्राणिशास्त्र विभागात राष्ट्रीय विज्ञान दिन-२०२६ चा उद्घाटन समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. " Women in Science: Catalysing Viksit Bharat " या विषयावर आधारित तीन दिवसीय कार्यक्रमांची सुरुवात प्रेरणादायी वातावरणात झाली. प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, एम.एस्सी. प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून करण्यात आली. या कार्यक्रमाच्या समन्वयीका प्रा. (डॉ.) एम. व्ही. वाळवेकर यांनी प्रस्तावनेतून राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व स्पष्ट केले तसेच कार्यक्रमाचे स्वरूप व नियोजन जाहीर केले. या वर्षी विविध स्पर्धासाठी एकूण १५६ स्पर्धकांनी नोंदणी केली असून त्यामध्ये ६६ निबंध, २६ प्रश्नमंजुषा, ३४ ई-पोस्टर, ६ कोलोकीयम, ११ वक्तृत्व आणि रांगोळी स्पर्धेचा समावेश आहे.

प्रमुख पाहुणे डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी



आपल्या भाषणात वैज्ञानिक संशोधनाचे महत्त्व, नवकल्पनांची गरज आणि विद्यार्थ्यांची राष्ट्रनिर्मितीतील भूमिका अधोरेखित केली. विद्यापीठातील महिला, विद्यार्थिनींनी संशोधन क्षेत्रातअधिक लक्ष केंद्रित करून नोबेल पारितोषिकापर्यंत मजल मारण्याचे ध्येय ठेवावे, असे त्यांनी आवाहन केले. तसेच विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना आदर्श मानून जिद्द, शिस्त आणि नेतृत्वगुण आत्मसात करावेत, असे मार्गदर्शन केले. विज्ञान क्षेत्रातील महिलांचे योगदान नमूद करत त्यांनी कमला सोहनी आणि जानकी अंमल यांच्या कार्याचा उल्लेख केला.


अध्यक्षीय भाषणात प्रा. (डॉ.) एस. आर. यंकंची यांनी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट केला व वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

तीन दिवसीय कार्यक्रमांतर्गत आयोजित स्पर्धांसाठी पुढील प्रमाणे समन्वयक कार्यरत आहेत : वक्तृत्व - प्रा. एम. पी. दांडगे, रांगोळी - डॉ. जे. पी. खराडे, प्रश्नमंजुषा डॉ. के. एस. ओझा व प्रा. जी. एस. राशिनकर विज्ञान कोलोकीयम - प्रा. व्ही. डी. जाधव व डॉ. एस. ए. पाटील, निबंध डॉ. ए. एस. जाधव, ई-पोस्टर डॉ. वैशाली सावंत.

या कार्यक्रमास प्रा. अ. अ. देशमुख, प्रा. एन. ए. कांबळे, प्रा. एस. एम. गायकवाड, प्रा. एम. पी. भिलावे, डॉ. ए. डी. गोफणे, डॉ. ए. एस. लोखंडे यांच्या सहसंशोधक विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रा. एन. ए. कांबळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. सानिका हेबळे यांनी सूत्रसंचालन केले, तर अपर्णा पाटील यांनी आभार मानले.

27 FEB 2026

सकाळ



कोल्हापूर : नोकरी महामेळाव्यात निवड झालेल्या उमदेवारांना नियुक्ती पत्रे दिली.

# राज्य नोकरी महामेळाव्यात निवडलेल्या उमेदवारांना पत्रे

## १३७ कंपन्या सहभागी; १९८६ जणांना रोजगार

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन आणि विद्यापीठ विकास मंचतर्फे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठामध्ये राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्याचे आयोजन केले होते. विद्यापीठ परिसरातील विविध अधिविभागांमध्ये मुलाखतीचे आयोजन केले होते. मुलाखतीमध्ये निवड झालेल्या १९८६ युवक आणि युवतींना त्याच दिवशी सायंकाळी नियुक्ती पत्रे दिली.

तसेच ४ हजार ९३७ एवढ्या युवक-युवतींना मुलाखतीच्या दुसऱ्या फेरीसाठी निवडले. ४ हजार ६८० युवक-युवतींची शैक्षणिक पात्रता आणि अनुभवाची कागदपत्रे कंपनीच्या प्रतिनिधींनी पुढील कार्यवाहीसाठी जमा करून घेतली. विविध कंपन्यांच्या ९००० जागांसाठी १७ हजार ८७२ युवक-युवती उपस्थित राहिले. रोजगार मेळाव्यात १३७ कंपन्या सहभागी झाल्या. यामध्ये इंजिनिअरिंग, मेडिकल, फार्मा, मॅन्युफॅक्चरिंग, बँकिंग, फायनान्स, विमा, अकाउंटिंग, आरोग्यसेवा, ऑटोमोबाईल, आयटी, नर्सिंगचा समावेश आहे. दरम्यान, विद्यापीठाचे विविध अधिकारी, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फौंडेशन, विद्यापीठ विकास मंचच्या अधिकाऱ्यांनी



मुलाखत कक्षास भेट देऊन पाहणी केली.

प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. माजी परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे, विद्यापीठ विकास मंचचे प्रदेशाध्यक्ष प्रा. एन. डी. पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, प्रशिक्षण अधिकारी शामल पवार, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फौंडेशनचे प्रतिनिधी नितीन माने, नेहा कुंभार यांचे सहकार्य लाभले. मेळावा यशस्वी करण्यासाठी मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे यांनी नियोजन केले. याकामी विद्यापीठाच्या अधिसभा व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, आधिविभागप्रमुख, शिक्षक, प्लेसमेंट अधिकारी, स्वयंसेवक यांनी योगदान दिले.

27 FEB 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान उपक्रमांचे उद्घाटन



कोल्हापूर : राष्ट्रीय विज्ञान उपक्रमांचे उद्घाटन करताना कुलसचिव व्ही. एन. शिंदे. बाजूस प्रा. डॉ. एम. व्ही. वाळवेकर व मान्यवर.

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ येथील प्राणिशास्त्र विभागात राष्ट्रीय विज्ञान दिन उपकम्राचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. 'वुमन्स इन सायन्स कॅटालायजिंग विकसित भारत या विषयावर आधारित तीन दिवसीय कार्यक्रमांची सुरुवात झाली. यावेळी प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, एम.एस्सी. प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून करण्यात आली. प्रा. डॉ. एम. व्ही. वाळवेकर यांनी प्रस्तावना केली. यंदा विविध स्पर्धासाठी एकूण १५६ स्पर्धकांनी नोंदणी केली असून त्यामध्ये ६६ निबंध, २६ प्रश्नमंजुषा, ३४ ई–पोस्टर, ६ कोलोकीयम, ११ वक्तृत्व आणि रांगोळी स्पर्धेचा समावेश आहे. स्पर्धांसाठी समन्वयक म्हणून प्रा. एम. पी. दांडगे, डॉ. जे. पी. खराडे, डॉ. के. एस. ओझा व प्रा. जी. एस. राशिनकर, प्रा. व्ही. डी. जाधव व डॉ. एस. ए. पाटील, डॉ. ए. एस. जाधव, डॉ. वैशाली सावंत. हे काम पाहणार आहेत. सानिका हेबळे यांनी सूत्रसंचालन केले. अपर्णा पाटील यांनी आभार मानले. यावेळी प्रा. अ. अ. देशमुख, प्रा. एन. ए. कांबळे, प्रा. एस. एम. गायकवाड, प्रा. एम. पी. भिलावे, डॉ. ए. डी. गोफणे, डॉ. ए. एस. लोखंडे यांच्या सहसंशोधक विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

27 FEB 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समावेशन आणि शाश्वततेची कास धरल्यास भारतीय अर्थव्यवस्थेचे भवितव्य उज्ज्वल : डॉ. एस. महेंद्र देव

कोल्हापूर/प्रतिनिधी : भारताने समावेशक आणि शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारल्यास भारतीय अर्थव्यवस्थेचे भवितव्य अत्यंत उज्ज्वल असून सन २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न निश्चितपणे साकार होईल, असा विश्वास भारताच्या पंतप्रधान कार्यालयाच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष तथा प्रख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. एस. महेंद्र देव यांनी केले.



शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त), भारतीय अर्थमिती संस्था आणि डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग आणि टेक्नोलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय अर्थमिती संस्था हीरक महोत्सवी (६० व्या) वार्षिक राष्ट्रीय परिषदेस आज शिवाजी विद्यापीठात प्रारंभ झाला. परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नीरज हातेकर अध्यक्षस्थानी होते. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उद्घाटक म्हणून तर डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. अनिल कुमार गुप्ता प्रमुख उपस्थित होते.

डॉ. देव यांनी यावेळी 'भारतीय अर्थव्यवस्था: काल, आज आणि उद्या' या विषयावर सविस्तर विवेचन केले. ते म्हणाले, जागतिक स्तरावर अनिश्चितता आणि अनेक आव्हाने असली तरी मजबूत देशांतर्गत मागणी, राजकीय स्थैर्य आणि व्यापक आर्थिक स्थैर्य यामुळे भारतीय अर्थव्यवस्था लवचिक राहिली आहे. मात्र, केवळ सकल राष्ट्रीय उत्पन्नवाढ पुरेशी नसून समावेशक आणि पर्यावरणपूरक विकासावर भर देणे आवश्यक आहे.

डॉ. देव म्हणाले की, विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी उत्पादन क्षेत्राचा विस्तार, विशेषतः श्रमप्रधान उद्योगांना प्रोत्साहन देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे रोजगारनिर्मिती वाढेल, निर्यात मजबूत होईल आणि संरचनात्मक परिवर्तनाला गती मिळेल. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राला बळकटी देणे, संशोधन व विकास मध्ये गुंतवणूक वाढविणे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अर्थव्यवस्थेसाठी तयारी करणे हे भविष्यातील यशाचे प्रमुख घटक ठरतील. भारताच्या विकासात राज्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून प्रत्येक राज्याने आपल्या क्षमतेनुसार विकासाचे स्वतंत्र उद्दिष्ट निश्चित करणे आवश्यक आहे. देशातील विविध राज्यांमध्ये विकासाची असमानता असल्याने संतुलित प्रादेशिक विकासावर विशेष भर देणे गरजेचे आहे. भारतातील लोकसंख्यात्मक लाभांश ही मोठी संधी असून तिचा योग्य वापर करण्यासाठी कौशल्य विकास, दर्जेदार शिक्षण आणि आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

हवामान बदल हा भारताच्या दीर्घकालीन विकासासाठी गंभीर आव्हान असून हरितगृह वायू उत्सर्जन कमी करणे आणि स्वच्छ ऊर्जा वापर वाढविणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणपूरक आणि हवामान-संवेदनशील विकास धोरण स्वीकारल्यास भारत आर्थिक प्रगतीसोबतच पर्यावरणीय संतुलनही राखू शकतो, असेही त्यांनी सांगितले.

2 7 FEB 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर

# चंद्रकांत पाटील मराठी साहित्याचे राखणदार

## डॉ.राजन गवस : डॉ.म.सु.पाटील समीक्षा पुरस्कार, २०२६ चे आयोजन

**जनप्रवास : कोल्हापूर**

ज्येष्ठ समीक्षक चंद्रकांत पाटील मराठी साहित्याच्या पिकाचे राखणदार, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ.राजन गवस यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये आयोजित करण्यात आलेल्या डॉ.म.सु.पाटील समीक्षा पुरस्कार, २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.विलास शिंदे उपस्थित होते.

डॉ.गवस पुढे म्हणाले, खेडयापाडयातील लिहित्या मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम चंद्रकांत पाटील यांनी केले. अफाट वाचनामुळे साहित्याविषयीची त्यांची भूमिका पक्की होती.

ज्येष्ठ समीक्षक चंद्रकांत पाटील म्हणाले, माणसांवर प्रेम करणाऱ्या समीक्षक म.सु.पाटील यांच्या नांवे दिला जाणारा पुरस्कार मला मिळणे हे गौरवास्पद आहे. नव्याने लिहिणाऱ्यांनी आपला आत्मा गहाण न टाकता समग्र अवकाशाविषयी जागरूकतेने लिहिले पाहिजे.

अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलसचिव डॉ.विलास शिंदे म्हणाले, पुस्तक परीक्षणाच्या पातळीवरील समीक्षेपेक्षा सैधांतिक पातळीवरील पातळीची समीक्षा चंद्रकांत पाटील यांची आहे. पुरस्कार वितरण सोहळ्याचे प्रास्ताविक मराठी अधिविभागप्रमुख डॉ.रणधीर शिंदे यांनी केले. मानपत्राचे वाचन डॉ.नंदकुमार मोरे यांनी केले. आभार डॉ.सुखदेव एकल यांनी मानले तर सुत्रसंचालन प्रांजली क्षीरसागर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. दिलीप धोंडगे, प्रा.प्रवीण बांदेकर, कृष्णात खोत, डॉ.एकनाथ पगार, आशुतोष पाटील, विरधवल परब, डॉ.अवनिश पाटील, डॉ.मेघा पानसरे, गौतमी पुत्रकांबळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.




**कोल्हापूर : डॉ.म.सु.पाटील समीक्षा पुरस्कार स्वीकारताना ज्येष्ठ समीक्षक चंद्रकांत पाटील .सोबत मान्यवर.**

27 FEB 2026
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ट्रेड डील, अमेरिकन टॅरिफचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होणार नाही

## पंतप्रधान कार्यालयाचे आर्थिक सल्लागार तथा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. एस. महेंद्र देव यांचे मत

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

पुढारी विशेष

भारताने जागतिक स्तरावर ३८ देशांबरोबर फ्री ट्रेड ॲग्रीमेंट (एफटीए) केले आहे. देशाला याचा मोठा फायदा होणार असून, आगामी काळात शेती व उद्योगाशी संबंधित वस्तू निर्यात करता येणे शक्य होईल. अमेरिकन ट्रेड डीलअंतर्गत भारताने शेती क्षेत्राशी निगडित दुग्धजन्य पदार्थ, मका, सोयाबीन या वस्तूंच्या आयातीस परवानगी दिलेली नाही. अमेरिकेने टॅरिफदेखील कमी केला आहे. त्यामुळे ट्रेड डील व अमेरिकन टॅरिफचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर आगामी काळात परिणाम होईल असे वाटत नाही, असे मत पंतप्रधान कार्यालयाच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष तथा प्रख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. एस. महेंद्र देव यांनी व्यक्त केले. तसेच, २०४७ मध्ये विकसित भारतासाठी अर्थव्यवस्था ३० ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित तीन दिवसीय राष्ट्रीय अर्थमिती परिषदेच्या उद्घाटन सत्रानंतर त्यांनी दै. 'पुढारी' प्रतिनिधीशी संवाद साधला. डॉ. देव यांनी विकसित भारत, अमेरिकन टॅरिफ व ट्रेड डील या विषयावर भाष्य केले. डॉ. देव म्हणाले, सध्या देशात गुंतवणुकीचे प्रमाण ३० टक्के आहे. यासाठी खासगी



ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. एस. महेंद्र देव

गुंतवणुकीत वाढ करावी लागणारं आहे. निर्यातीचे प्रमाण वाढल्यास जीडीपी वाढून रोजगाराच्या संधी निर्माण होतील. डिजिटल टेक्नॉलॉजी, एआय, आरोग्य, शिक्षण याबरोबरच भारतात जगात सर्वाधिक असलेले तरुण देशाच्या विकासासाठी लाभदायक ठरणार आहेत, असे ते म्हणाले.

महिलांचा रोजगार क्षेत्रातील सहभाग जगाच्या ५० टक्केच्या तुलनेत भारतात ३५ टक्के आहे. येणाऱ्या काळात महिला जास्तीत जास्त रोजगारक्षम कशा होतील, याकडे लक्ष दिले जात आहे. प्रत्येक देशात बेरोजगार तरुणांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालल्याचे दिसून येते. सध्या विद्यापीठांमधून मुले पदवी घेऊन बाहेर पडत आहेत. त्याच्याकडे उद्योगासाठी आवश्यक कौशल्ये नसल्याने रोजगार मिळत नाही. त्यामुळे भारत सरकारने रोजगार कौशल्य विकसित करण्यावर भर दिला आहे. शेती क्षेत्रात रोजगाराचे ४६ टक्के प्रमाण आहे, दुसऱ्या देशात हे प्रमाण फार कमी आहे, असेही डॉ. महेंद्र देव म्हणाले.

### 'एआय'मुळे नवीन रोजगार निर्माण होतील

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (एआय) नोकऱ्या जाणार नाहीत, उलट उत्पादन व इतर क्षेत्रांत याचा मोठा वापर सुरू झाला आहे. आरोग्य, शिक्षण व उद्योग क्षेत्रांत 'एआय'चे महत्त्व वाढत चालल्याने हजारो नवीन रोजगार निर्माण होतील, असा विश्वास डॉ. महेंद्र देव यांनी व्यक्त केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 FEB 2026

महा न्यूज ॲंड व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# समावेशन आणि शाश्वततेची कास धरल्यास भारतीय अर्थव्यवस्थेचे भवितव्य उज्ज्वल : डॉ. एस. महेंद्र देव

## शिवाजी विद्यापीठात तीनदिवसीय राष्ट्रीय अर्थमिती परिषदेस प्रारंभ

**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

भारताने समावेशक आणि शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारल्यास भारतीय अर्थव्यवस्थेचे भवितव्य अत्यंत उज्ज्वल असून सन २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न निश्चितपणे साकार होईल, असा विश्वास भारताच्या पंतप्रधान कार्यालयाच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष तथा प्रख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. एस. महेंद्र देव यांनी केले.



शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त), भारतीय अर्थमिती संस्था आणि डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग आणि टेक्नोलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय अर्थमिती संस्था हीरक महोत्सवी (६० व्या) वार्षिक राष्ट्रीय परिषदेस आज शिवाजी विद्यापीठात प्रारंभ झाला. परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नीरज हातेकर अध्यक्षस्थानी होते. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उद्घाटक म्हणून तर डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. अनिल कुमार गुप्ता प्रमुख उपस्थित होते.

डॉ. देव यांनी यावेळी भारतीय अर्थव्यवस्था: काल, आज आणि उद्याफ या विषयावर सविस्तर विवेचन केले. ते म्हणाले, जागतिक स्तरावर अनिश्चितता आणि अनेक आव्हाने असली तरी मजबूत देशांतर्गत मागणी, राजकीय स्थैर्य आणि व्यापक आर्थिक स्थैर्य यामुळे भारतीय अर्थव्यवस्था लवचिक राहिली आहे. मात्र, केवळ सकल राष्ट्रीय उत्पन्नवाढ पुरेशी नसून समावेशक आणि पर्यावरणपूरक विकासावर भर देणे आवश्यक आहे.

डॉ. देव म्हणाले की, विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी उत्पादन क्षेत्राचा विस्तार, विशेषतः श्रमप्रधान उद्योगांना प्रोत्साहन देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे रोजगारनिर्मिती वाढेल, निर्यात मजबूत होईल आणि संरचनात्मक परिवर्तनाला गती मिळेल. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राला बळकटी देणे, संशोधन व विकास मध्ये गुंतवणूक वाढविणे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अर्थव्यवस्थेसाठी तयारी करणे हे भविष्यातील यशाचे प्रमुख घटक ठरतील. भारताच्या विकासात राज्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून प्रत्येक राज्याने आपल्या क्षमतेनुसार विकासाचे स्वतंत्र उद्दिष्ट निश्चित करणे आवश्यक आहे. देशातील विविध राज्यांमध्ये विकासाची असमानता असल्याने संतुलित प्रादेशिक विकासावर विशेष भर देणे गरजेचे आहे. भारतातील लोकसंख्यात्मक लाभांश ही मोठी संधी असून तिचा योग्य वापर करण्यासाठी कौशल्य विकास, दर्जेदार शिक्षण आणि आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

हवामान बदल हा भारताच्या दीर्घकालीन विकासासाठी गंभीर आव्हान असून हरितगृह वायू उत्सर्जन कमी करणे आणि स्वच्छ ऊर्जा वापर वाढविणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणपूरक आणि हवामान-संवेदनशील विकास धोरण स्वीकारल्यास भारत आर्थिक प्रगतीसोबतच पर्यावरणीय संतुलनही राखू शकतो, असेही त्यांनी सांगितले.

उद्घाटनपर मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, भारतीय अर्थमिती संस्थेने देशाच्या आर्थिक विकासामध्ये मार्गदर्शकाची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. येथून पुढच्या काळात जनुकीय परिवर्तनाधारिक पिके तसेच नवऔषध निर्माणाला जगाच्या अर्थकारणात मोठे महत्त्व प्राप्त होणार आहे. कोविड-१९च्या साथीने त्याची चुणूक आपल्याला दाखविली आहे. त्यामुळे आधुनिक जैवतंत्रज्ञानाच्या युगामध्ये औषधनिर्माण शास्त्रातील संशोधन व विकास या बाबींना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीनेही अर्थशास्त्रज्ञांनी आता विचार व कृती करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. नीरज हातेकर यांनी संशोधकांना सूक्ष्म आणि स्थानिक आकडेवारीच्या अभ्यासाकडे वळण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, आपल्याकडे उपलब्ध असलेल्या प्रचंड अशा स्थाननिहाय आकडेवारीतून अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण प्रवृत्ती आणि विषमता अधिक अचूकपणे समजून घेता येतात; मात्र, यासाठी प्रगत सांख्यिकी व अर्थमिती तंत्रांसह प्रचंड संगणकीय क्षमतेची आवश्यकता असते. भविष्यात संशोधनातील सर्वात मोठे आव्हान हे सॉफ्टवेअर किंवा डेटा नव्हे, तर संगणकीय क्षमता, इंटरनेट गती आणि हार्डवेअर असेल. तसेच, मोठ्या डेटावर आधारित संशोधनासाठी संशोधकांमध्ये व्यापक सहकार्य आणि नेटवर्किंग अत्यावश्यक असून या क्षेत्रात अधिकाधिक संशोधकांनी सहभागी होण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. महादेव देशमुख यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. देशमुख यांच्या दि थ्री डीज्फया पुस्तकाचे तसेच परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. भारतीय अर्थमिती संस्थेचे सचिव डॉ. के. षण्मुगन यांनी आभार मानले. या तीनदिवसीय परिषदेसाठी २२ राज्यांतून ३०० पेक्षा अधिक शिक्षक, अर्थशास्त्रज्ञ, संशोधक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित आहेत.

27 FEB 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वततेची कास धरल्यास विकसित भारताचे स्वप्न साकार

## डॉ. एस. महेंद्र देव : शिवाजी विद्यापीठात तीन दिवसीय राष्ट्रीय अर्थमिती परिषदेस प्रारंभ


**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारताने समावेशक आणि शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारल्यास भारतीय अर्थव्यवस्थेचे भवितव्य उज्ज्वल आहे. २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न निश्चितपणे साकार होईल, असा विश्वास भारताच्या पंतप्रधान कार्यालयाच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष तथा प्रख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. एस. महेंद्र देव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त), भारतीय अर्थमिती संस्था आणि डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय अर्थमिती संस्था हीरकमहोत्सवी (६० व्या) वार्षिक राष्ट्रीय परिषदेस गुरुवारी विद्यापीठात प्रारंभ झाला. परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नीरज हातेकर अध्यक्षस्थानी होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उद्घाटक व डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. अनिल कुमार गुप्ता प्रमुख उपस्थित होते.

डॉ. देव यांनी यावेळी 'भारतीय अर्थव्यवस्था : काल, आज आणि उद्या' या विषयावर विवेचन केले. ते म्हणाले, जागतिक स्तरावर अनिश्चितता व अनेक आव्हाने असली तरी मजबूत देशांतर्गत मागणी, राजकीय स्थैर्य आणि व्यापक आर्थिक स्थैर्य यामुळे भारतीय अर्थव्यवस्था लवचिक राहिली आहे. मात्र, केवळ सकल राष्ट्रीय उत्पन्नवाढ पुरेशी नसून समावेशक व पर्यावरणपूरक विकासावर भर देणे आवश्यक आहे.'





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित तीन दिवसीय राष्ट्रीय अर्थमिती परिषदेत बोलताना पंतप्रधान कार्यालयाच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. एस. महेंद्र देव. समोर उपस्थित शिक्षक, अर्थशास्त्रज्ञ, संशोधक, विद्यार्थी.

विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी उत्पादन क्षेत्राचा विस्तार, विशेषतः श्रमप्रधान उद्योगांना प्रोत्साहन देणे महत्त्वाचे आहे. यामुळे रोजगार निर्मिती वाढेल, निर्यात मजबूत होईल आणि संरचनात्मक परिवर्तनाला गती मिळेल. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राला बळकटी देणे, संशोधन व विकास मध्ये गुंतवणूक वाढविणे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अर्थव्यवस्थेसाठी तयारी करणे हे भविष्यातील यशाचे प्रमुख घटक ठरतील. भारताच्या विकासात राज्यांची भूमिका महत्त्वाची असून प्रत्येक राज्याने आपल्या क्षमतेनुसार विकासाचे स्वतंत्र उद्दिष्ट निश्चित करणे आवश्यक आहे. देशातील विविध राज्यांमध्ये विकासाची असमानता असल्याने संतुलित प्रादेशिक विकासावर विशेष भर देणे गरजेचे आहे. भारतातील लोकसंख्यात्मक लाभांश ही मोठी संधी असून तिचा योग्य वापर करण्यासाठी कौशल्य विकास, दर्जेदार शिक्षण व आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

उद्घाटनपर मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, भारतीय अर्थमिती संस्थेने देशाच्या आर्थिक विकासामध्ये मार्गदर्शकाची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. पुढच्या काळात जनुकीय परिवर्तनाधारिक पिके तसेच नवऔषध निर्माणाला जगाच्या अर्थकारणात मोठे महत्त्व प्राप्त होणार आहे. कोव्हिड-१९च्या साथीने त्यांची चुणूक दाखविली आहे. त्यामुळे आधुनिक जैवतंत्रज्ञानाच्या युगामध्ये औषधनिर्माण शास्त्रातील संशोधन व विकास या बाबींना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने अर्थशास्त्रज्ञांनी आता विचार व कृती करण्याची आवश्यकता आहे.



**कोल्हापूर : राष्ट्रीय अर्थमिती परिषदेचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करताना पंतप्रधान कार्यालयाच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. एस. महेंद्र देव. सोबत (डावीकडून) डॉ. अनिलकुमार गुप्ता, डॉ. नीरज हातेकर, डॉ. महादेव देशमुख व प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. (छाया : पप्पू अत्तार)**

अध्यक्षीय मनोगतात डॉ. नीरज हातेकर म्हणाले, संशोधकांनी सूक्ष्म व स्थानिक आकडेवारीच्या अभ्यासाकडे वळले पाहिजे. आपल्याकडे उपलब्ध असलेल्या प्रचंड अशा स्थाननिहाय आकडेवारीतून अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण प्रवृत्ती आणि विषमतः अधिक अचूकपणे समजून घेता येतात. मात्र, यासाठी प्रगत सांख्यिकी व अर्थमिती तंत्रांसह प्रचंड संगणकीय क्षमतेची आवश्यकता असते. भविष्यात संशोधनातील सर्वात मोठे आव्हान हे सॉफ्टवेअर किंवा डेटा नव्हे, तर संगणकीय क्षमता, इंटरनेट गती आणि हार्डवेअर असेल. तसेच मोठ्या डेटावर आधारित संशोधनासाठी संशोधकांमध्ये व्यापक सहकार्य आणि नेटवर्किंग अत्यावश्यक असून या क्षेत्रात अधिकाधिक संशोधकांनी सहभागी होण्याची गरज आहे.

अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. महादेव देशमुख यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी डॉ. देशमुख यांच्या 'दि थ्री डीजे' या पुस्तकाचे व परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. भारतीय अर्थमिती संस्थेचे सचिव डॉ. के. षण्मुगन यांनी आभार मानले. तीन दिवसीय परिषदेसाठी २२ राज्यांतून ३०० पेक्षा अधिक शिक्षक, अर्थशास्त्रज्ञ, संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.

### हवामान बदल देशाच्या विकासापुढील गंभीर आव्हान

हवामान बदल हा भारताच्या दीर्घकालीन विकासासाठी गंभीर आव्हान आहे. हरितगृह वायू उत्सर्जन कमी करणे व स्वच्छ ऊर्जा वापर वाढविणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणपूरक व हवामान-संवेदनशील विकास धोरण स्वीकारल्यास भारत आर्थिक प्रगतीसोबतच पर्यावरणीय संतुलन राखू शकतो, असेही डॉ. देव म्हणाले.

### परकीय गुंतवणुकीचा दर ३५ टक्क्यांपर्यंत नेण्याचे प्रयत्न

निर्यात आणि परकीय व इतर गुंतवणूक दर हे देशाच्या विकासातील महत्त्वाचे घटक आहेत. सध्या गुंतवणूक दर हा ३२ टक्के आहे. गुंतवणुकीचा हा दर ३५ टक्क्यांपर्यंत नेल्यास विकासाचा दर ८ टक्क्यांपर्यंत पोहोचेल. यासाठी खासगी गुंतवणूक महत्त्वाची असल्याचे डॉ. देव म्हणाले.

27 FEB 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समावेशन, शाश्वततेमुळे अर्थव्यवस्थेचे भवितव्य उज्ज्वल

## डॉ. एस. महेंद्र देव; शिवाजी विद्यापीठात तीनदिवसीय राष्ट्रीय अर्थमिती परिषदेस प्रारंभ



**कोल्हापूर** : भारताने समावेशक आणि शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारल्यास भारतीय अर्थव्यवस्थेचे भवितव्य अत्यंत उज्ज्वल असून, २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न निश्चितपणे साकार होईल, असा विश्वास पंतप्रधान कार्यालयाच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष तथा प्रख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. एस. महेंद्र देव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग, भारतीय अर्थमिती संस्था आणि डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय अर्थमिती संस्था हीरकमहोत्सवी (६० व्या) वार्षिक राष्ट्रीय परिषदेस शिवाजी विद्यापीठात प्रारंभ झाला. या परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नीरज हातेकर अध्यक्षस्थानी होते. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उद्घाटक, तर डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता प्रमुख उपस्थित होते.

डॉ. देव यांनी यावेळी 'भारतीय अर्थव्यवस्था : काल, आज आणि उद्या' या विषयावर सविस्तर विवेचन केले. ते म्हणाले, जागतिक स्तरावर अनिश्चितता आणि अनेक आव्हाने असली तरी मजबूत देशांतर्गत मागणी, राजकीय स्थैर्य आणि व्यापक आर्थिक स्थैर्य यामुळे भारतीय अर्थव्यवस्था लवचीक राहिली आहे; मात्र केवळ सकल राष्ट्रीय उत्पन्नवाढ पुरेशी नसून समावेशक आणि पर्यावरणपूरक विकासावर भर देणे आवश्यक आहे.

उद्घाटनपर मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांनी, पुढच्या काळात जनुकीय परिवर्तनाधारिक पिके तसेच नवऔषध निर्माणाला जगाच्या अर्थकारणात मोठे महत्त्व प्राप्त होणार असल्याचे सांगितले. अध्यक्षीय मनोगतात डॉ. नीरज हातेकर यांनी, भविष्यात संशोधनातील सर्वात मोठे आव्हान हे सॉफ्टवेअर किंवा डेटा नव्हे, तर संगणकीय क्षमता, इंटरनेट गती आणि हार्डवेअर असेल.

27 FEB 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वत विकासच साकारेल विकसित भारत

## अर्थतज्ज्ञ डॉ. एस. महेंद्र देव : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय अर्थमिती परिषदेस प्रारंभ

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २६ : 'भारताने समावेशक आणि शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारल्यास भारतीय अर्थव्यवस्थेचे भवितव्य अत्यंत उज्ज्वल असून, २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न निश्चितपणे साकार होईल', असा विश्वास पंतप्रधान कार्यालयाच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष तथा प्रख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. एस. महेंद्र देव यांनी केले.**

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग, भारतीय अर्थमिती संस्था आणि डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि टेक्नोलॉजीतर्फे भारतीय अर्थमिती संस्था हिरकमहोत्सवी वार्षिक राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नीरज हातेकर होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. अनिल कुमार गुप्ता प्रमुख उपस्थित होते.

डॉ. देव यांनी 'भारतीय अर्थव्यवस्था: काल, आज आणि उद्या' या विषयाची मांडणी केली. ते म्हणाले, 'जागतिकस्तरावर अनिश्चितता आणि अनेक आव्हाने असली तरी मजबूत देशांतर्गत मागणी, राजकीय स्थैर्य आणि व्यापक आर्थिक स्थैर्य यामुळे भारतीय अर्थव्यवस्था लवचिक राहिली आहे. मात्र, केवळ सकल राष्ट्रीय उत्पन्नवाढ पुरेशी नसून समावेशक आणि पर्यावरणपूरक विकासावर भर देणे आवश्यक आहे.'

प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, 'भारतीय अर्थमिती संस्थेने देशाच्या आर्थिक विकासामध्ये मार्गदर्शकाची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.'

डॉ. हातेकर यांनी संशोधकांना सूक्ष्म आणि स्थानिक आकडेवारीच्या अभ्यासाकडे वळण्याचे आवाहन केले.

### संवेदनशील विकास धोरण स्वीकारावे

'हवामान बदल हा भारताच्या दीर्घकालीन विकासासाठी गंभीर आव्हान आहे. हरितगृह वायू उत्सर्जन कमी करणे आणि स्वच्छ ऊर्जा वापर वाढविणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणपूरक आणि हवामान-संवेदनशील विकास धोरण स्वीकारल्यास भारत आर्थिक प्रगतीसह पर्यावरणीय संतुलनही राखू शकतो', असे डॉ. देव यांनी सांगितले.

भविष्यात संशोधनातील सर्वात मोठे आव्हान हे सॉफ्टवेअर किंवा डेटा नव्हे, तर संगणकीय क्षमता, इंटरनेट गती आणि हार्डवेअर असेल. मोठ्या डेटावर आधारित संशोधनासाठी संशोधकांमध्ये व्यापक सहकार्य आणि नेटवर्किंग अत्यावश्यक असून, या क्षेत्रात अधिकाधिक संशोधकांनी सहभागी होण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. महादेव देशमुख यांनी स्वागत केले. मान्यवरांच्या हस्ते डॉ. देशमुख यांच्या 'दि थ्री डीज्' या पुस्तकाचे तसेच परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन झाले. भारतीय अर्थमिती संस्थेचे सचिव डॉ. के. षण्मुगन यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठ : राष्ट्रीय अर्थमिती परिषदेच्या उद्घाटन समारंभात दीपप्रज्वलन करताना पंतप्रधान कार्यालयाच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. एस. महेंद्र देव. यावेळी उपस्थित डावीकडून डॉ. अनिल कुमार गुप्ता, नीरज हातेकर, महादेव देशमुख, ज्योती जाधव.

जनसंपर्क कक्ष
27 FEB 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय अर्थमिती परिषदेच्या उद्घाटन समारंभात दीपप्रज्वलन करताना पंतप्रधान कार्यालयाच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. एस. महेंद्र देव. सोबत (डावीकडून) डॉ. अनिल कुमार गुप्ता, डॉ. नीरज हातेकर, डॉ. महादेव देशमुख आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव.

# समावेशन, शाश्वततेची कास धरल्यास देशाचे भवितव्य उज्ज्वल

**• डॉ. एस. महेंद्र देव यांचे मत : शिवाजी विद्यापीठात अर्थमिती परिषदेचे आयोजन**

**जनप्रवास : कोल्हापूर**

समावेशन आणि शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारल्यास भारतीय अर्थव्यवस्थेचे भवितव्य अत्यंत उज्ज्वल आहे. सन २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न निश्चितपणे साकार होईल, असा विश्वास भारताच्या पंतप्रधान कार्यालयाच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष तथा प्रख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. एस. महेंद्र देव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त), भारतीय अर्थमिती संस्था आणि डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग आणि टेक्नोलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय अर्थमिती संस्था हीरक महोत्सवी (६० व्या) वार्षिक राष्ट्रीय परिषदेस शिवाजी विद्यापीठात प्रारंभ झाला. परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नीरज हातेकर अध्यक्षस्थानी होते. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उद्घाटक म्हणून तर डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. अनिल कुमार गुप्ता प्रमुख उपस्थित होते.

डॉ. देव यांनी यावेळी 'भारतीय अर्थव्यवस्था : काल, आज आणि उद्या'या विषयावर सविस्तर विवेचन केले. ते म्हणाले, जागतिक स्तरावर अनिश्चितता आणि अनेक आव्हाने असली तरी मजबूत देशांतर्गत मागणी, राजकीय स्थैर्य आणि व्यापक आर्थिक स्थैर्य यामुळे भारतीय अर्थव्यवस्था लवचिक राहिली आहे. मात्र, केवळ सकल राष्ट्रीय उत्पन्नवाढ पुरेशी नसून समावेशक आणि पर्यावरणपूरक विकासावर भर देणे आवश्यक आहे.

उद्घाटनपर मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, भारतीय अर्थमिती संस्थेने देशाच्या आर्थिक विकासामध्ये मार्गदर्शकाची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. येथून पुढच्या काळात जनुकीय परिवर्तनाधारिक पिके तसेच नवऔषध निर्माणाला जगाच्या अर्थकारणात मोठे महत्त्व प्राप्त होणार आहे. अध्यक्षीय मनोगतात डॉ. नीरज हातेकर यांनी संशोधकांना सूक्ष्म आणि स्थानिक आकडेवारीच्या अभ्यासाकडे वळण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. महादेव देशमुख यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. देशमुख यांच्या 'दि थ्री डीज्' या पुस्तकाचे तसेच परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन केले. भारतीय अर्थमिती संस्थेचे सचिव डॉ. के. षण्मुगन यांनी आभार मानले. या तीनदिवसीय परिषदेसाठी २२ राज्यांतून ३०० पेक्षा अधिक शिक्षक, अर्थशास्त्रज्ञ, संशोधक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित आहेत.